# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

Phone No. 24010437 / 24020781
Visit us at : http://mpcb.gov.in
Email : jdwaterdivision@mpcb.gov.in

Kalptaru Point 2nd floor,
Sion Matunga Scheme Road
No. 8, Infant of Sion Cercal,
Sion (E), Mumbai – 400 022.

"Your Service is our Duty"

No./MPCB/JD(WPC)/ENV/PH/B- 220407-FTS-0066 Date: 07 /04/2021

To,
**Ministry of Environment,**
**Forests & Climate Change Indira Paryavaran Bhavan,**
**Jor Bagh Road, New Delhi-110 003.**

**Sub:** Environmental Clearance - Proceedings of Public Hearing in respect of **Proposed** Expansion of Distillery from 200 KLPD (140 KLPD Grain/ Molasses & 60 KLPD Grain based) to 400 KLPD along with 3.0 MW to 8.5 MW Co-Generation power plant by new installation of 200 KLPD Grain based Distillery along with 5.5 MW Co-Generation power plant **Proposed by** M/s. Radico NV Distillery Maharashtra Ltd, D-192 to D-195, MIDC Shendra Five Star Industrial area, Tehsil & District Aurangabad, Maharashtra.

**Ref:** Sub-Regional Office Aurangabad-I vide letter dt. 28.03.2022 received on 04.04.2022.

....................

Sir,

The Public Hearing for the **Proposed** Expansion of Distillery from 200 KLPD (140 KLPD Grain/ Molasses & 60 KLPD Grain based) to 400 KLPD along with 3.0 MW to 8.5 MW Co-Generation power plant by new installation of 200 KLPD Grain based Distillery along with 5.5 MW Co-Generation power plant **Proposed by** M/s. Radico NV Distillery Maharashtra Ltd, D-192 to D-195, MIDC Shendra Five Star Industrial area, Tehsil & District Aurangabad, Maharashtra. Environmental public hearing extended on **dtd. 14.03.2022, Time-11.30 A.M, at M/s. Radico NV Distillery Maharashtra Ltd, D-192 to D-195, MIDC Shendra Five Star Industrial area, Tehsil & District Aurangabad, Maharashtra.** The minutes of the public hearing approved and duly signed by the Public hearing panel along with the proceedings are enclosed.

a. Minutes of public hearing duly signed by the Chairman of public hearing panel in (English & Marathi)
b. Copy of Office Order
c. Video DVD and Photograph of Public Hearing.
d. List of participants.
e. Newspaper Notices for Environmental Public Hearing in English & Marathi.

This is submitted for further necessary action please.

**Yours Sincerely,**

07.04.2022

**Dr. Y. B. Sontakke**
**Joint Director (WPC)**

**Encl:** As above

**Copy submitted for Information to:**

The Member Secretary, MPCB, Mumbai.

**Copy for information & necessary action to:**

1) The Regional Officer, MPCB, Aurangabad.
2) The Sub Regional Office, MPCB, Aurangabad-I.
3) EIC, M.P. C. Board, Mumbai - For information & display of Minutes on website.

**Copy to the applicant of the project:**

M/s. Radico NV Distillery Maharashtra Ltd, D-192 to D-195, MIDC Shendra Five Star Industrial area, Tehsil & District Aurangabad, Maharashtra.

दै. सकाळ पेपर
दि:- 10-02-2022

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद

## पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणीची सूचना

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय नवी दिल्ली यांचे दि. १४/०९/२००६ च्या अधिनियमान्वये व दि. ०१ डिसेंबर २००९ च्या व त्यापुढील सुधारित अधिनियमान्वये मे. रेडिको एन व्ही डिस्टलरीज, महाराष्ट्र लि., प्लॉट नं. डी-१९२ ते डी-१९५, पंचतारांकीत औद्योगिक वसाहत शेंद्रा, ता. जि. औरंगाबाद यांच्या सध्याच्या उद्योग आवारात नवीन २०० केएलपीडी धान्यावर आधारित आसवणी प्रकल्प उभारून सध्याच्या २०० केएलपीडी आसवणी प्रकल्पाचा (१४० केएलपीडी मळी/धान्य आणि ६० केएलपीडी धान्यावर आधारित) विस्तार करून ४०० केएलपीडी धान्यावर आधारित आसवणी प्रकल्प करण्याचा आणि त्यासोबत नवीन ५.५ मेगावॅट सहनिर्मिती ऊर्जा केंद्र उभारून सध्याच्या ३ मेगावॅट सहनिर्मिती ऊर्जा केंद्राचा विस्तार करून ८.५ मेगावॅट सहनिर्मिती ऊर्जा केंद्र करण्याचा प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी घेणेसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे अर्ज सादर केला होता. त्या अनुषंगाने दैनिक सकाळ या मराठी व टाईम्स ऑफ इंडिया या इंग्रजी वर्तमानपत्रात सदर जाहीर सुनावणी दि. २१/०१/२०२२ रोजी घेण्यासंबंधीची जाहीर सूचना दि. २०/१२/२०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. तथापि, मा. जिल्हादंडाधिकारी यांच्या सूचनेनुसार सदर जनसुनावणी कोविड-१९ च्या साथीची परिस्थिती असल्यामुळे पुढील आदेशापर्यंत स्थगित करण्यात आली होती व तशी सूचना दैनिक सकाळ या मराठी व टाईम्स ऑफ इंडिया या इंग्रजी वर्तमानपत्रात दि. १४/०१/२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. मा. जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी यांनी उपरोक्त उद्योगाची जाहीर जनसुनावणी दिनांक १४/०३/२०२२ रोजी घेण्यासाठी सूचना केलेली आहे. सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरणविषयक सूचना विचार, टीका टिप्पणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर जन/लोकसुनावणी आयोजित करण्यात येत आहे.

सदर प्रकल्पाच्या परिसरामधील रहिवाशी, पर्यावरणविषयक काम करणाऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांनी सदर प्रस्तावित प्रकल्पासंबंधी टीका/टिप्पणी, अभिप्राय, तक्रार किंवा आक्षेप तोंडी किंवा लेखी स्वरुपात नोंदविता येतील. लेखी स्वरुपात सूचना ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांपर्यंत खालील पत्त्यावर पाठविण्यात याव्यात.

**उप प्रादेशिक कार्यालय,**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,**
**प्लॉट नं. अ-४/१, पर्यावरण भवन, चिकलठाणा औद्योगिक परिसर,**
**सेठ नंदलाल धूत हॉस्पिटलच्या मागील बाजूस, औरंगाबाद.**
**ई-मेल द्वारे – sroaurangabad1@mpcb.gov.in**
**मोबाईल नंबर - ९८२२०१३६६९**

सदर प्रकल्पाच्या परिसरामधील रहिवाशी, पर्यावरणविषयक काम करणाऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी लोकसुनावणीमध्ये आपला प्रत्यक्षरित्या सहभाग नोंदवू शकतात.

**सुनावणीचे ठिकाण** :- मे. रेडिको एन व्ही डिस्टलरीज महाराष्ट्र लि., प्लॉट नं. डी-१९२ ते डी-१९५, पंचतारांकित औद्योगिक वसाहत शेंद्रा, ता. जि. औरंगाबाद (उद्योगाच्या परिसरात)
**सुनावणीची तारीख** :- १४/०३/२०२२
**सुनावणीचे वेळ** :- सकाळी ११.३० वा.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांशाची माहिती असलेले दस्तावेज (इंग्रजी व मराठी) मध्ये खालील कार्यालयांमध्ये व म.प्र.नि. मंडळाच्या संकेतस्थळावर (http//:www.mpcb.gov.in) नागरिकांच्या अभ्यासासाठी ठेवण्यात आलेले आहेत. संबंधित व्यक्ती खालील कार्यालयामध्ये सदर कागदपत्रे कार्यालयीन वेळेत अभ्यासू शकतील.

१. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद. २. जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद. ३. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ कार्यालय, रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद. ४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद. ५. तहसिलदार, तहसिल कार्यालय, औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद. ६. गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद ७. ग्रामपंचायत कार्यालय, हिरापूर, शेंद्रा कमंगर, कुंभेफळ, लाडगाव, करमाड, हिवरा, टोणगाव, जडगाव, शेंद्राबन, वडखा, वरझडी, गंगापूर शेंद्रा, शेंद्रा जहांगीर, दूधड, भांबरडा, ता. जि. औरंगाबाद. ८. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, प्लॉट नं. ए-४/१, एमआयडीसी, चिकलठाणा, औरंगाबाद. ९. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, प्लॉट न. ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा औरंगाबाद. १०. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं. ८, सायन सर्कलसमोर, सायन (पूर्व), मुंबई-२२. ११. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२. १२. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नवीन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

सदर पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी महाराष्ट्र शासनाच्या कोविड-१९ नियमांच्या अधीन राहून घेण्यात येईल. लोकसुनावणीसाठी हजर राहू इच्छित जनतेला नम्र विनंती की, त्यांनी तोंडाला मास्क लावावा, हॅण्ड सॅनिटायझर व सोशल डिस्टन्सिंग (योग्य ते अंतर) चे पालन करावे.

स्वाक्षरित/-
**(प्र. द. वानखेडे)**
**उप-प्रादेशिक अधिकारी**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद.**